# देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर.

(विधी व न्याय विभाग अंतर्गत)

२४०२ "ए " वॉर्ड, अपना बँक बिल्डींग तळमजला, उभा मारुती चौक, शिवाजी पेठ, कोल्हापूर.

फोन नं.(०२३१) २६२६१४७, २६२६७५० फॅक्स: (०२३१) २६२६७५०

E-mail - dmckolhapur@gmail.com Visit : www.mahalaxmikolhapur.com

देवस्थान व्यवस्थापन समिती
पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर


क्र. देव वशि जा. १२६८/2023 दिनांक - 28 JUN 2023

## दरपत्रक मागणी सुचना

**श्री करवीर निवासिनी मंदिराकडील गाभाऱ्यातील मेघडंबरी व त्यासमोरील कमान नव्याने करणे कामी क्ले मॉडेलिंग व फायबर मॉडेल तयार करणे करीता दरपत्रक देणे बाबत**

शहर कोल्हापूर येथील श्री करवीर निवासिनी मंदिराकडील मुख्य गाभाऱ्यामध्ये मुर्तीच्या वर लाकडी मेघडंबरी असुन त्याच्या समोर लाकडी नक्षीदार कमान असुन त्यास चांदीने मडविले आहे. सदर मेघडंबरी व समोरील नक्षीदार कमान ही संपुर्णपणे चांदीमध्ये करणेची बाब विचाराधीन आहे. त्यानुसार सदर मेघडंबरीची व समोरील नक्षीदार कमानीचे प्रत्यक्ष मापाप्रमाणे क्ले मॉडेल तयार करुन डिझाईन अंतिम करुन फायबर (GP Regsin) मध्ये मॉडेल तयार करावे लागणार आहे. सदर काम करणेस तयार असल्यास खालील मसुद्याप्रमाणे दर देणेत यावेत.

| क्र. | कामाचा तपशील | एकत्रित दर (सर्व करासहित व वाहतुकीसह) |
|---|---|---|
| १ | जागेवरील प्रत्यक्ष मापाप्रमाणे खालील कामांचे डिझाईन तयार करणे त्यानंतर क्ले मॉडेल तयार करणे, क्ले मॉडेलचे काम प्रत्यक्ष पाहणी अंती अंतिम केलेनंतर त्याचे प्लास्टर मोल्डींग करणे व त्यातून फायबर (GP Regsin) मध्ये मॉडेल तयार करणे. | |
| १.१ | मेघडंबरीचे ४ खांब, त्यावरील लाकडी बिम व छत | रु. /- |
| १.२ | मेघडंबरीचे खांबामधील आठ खिडक्या व एक चौकट | रु. /- |
| १.३ | मेघडंबरीच्या पुढील पायरी वरील चार खांब व तीन मोठया कमानी | रु. /- |

वरील प्रमाणे कामांकरीता कंपनीचे लेटरपॅड वर सिलबंद दरपत्रक या कार्यालयाकडे दि. ३० /०६/२०२३ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपुर्वी पोहोच करणेत यावे. सदर सिलबंद दरपत्रकावर विषय, दरपत्रक देणा-यांचे नाव व संपर्क नंबर नमुद करावा. दरपत्रकासोबत पॅन कार्डची प्रत देणेत यावी

अटी व शर्ती खालील प्रमाणे

१. सदर कामाची सर्व माहिती घेवून आवश्यक स्पेसिफिकेशन प्रमाणे काम करुन देणेचे आहे.
२. सदर कामाची मुदत ४५ दिवस इतकी राहिल.
३. सदर दरपत्रकामध्ये नमुद करणेत येणारे दर हे सर्व करासहित, सर्व आवश्यक साहित्य व वाहतुक खर्चासहित देणेचे आहेत.
४. दरपत्रक मंजूर झाले दराशिवाय कोणत्याही कारणास्तव दर वाढवून दिले जाणार नाहीत.
५. दिले मुदतीमध्ये दरपत्रक प्राप्त न झालेस स्विकारले जाणार नाही.
६. दरपत्रकासोबत जीएसटी सर्टीफिकेट (लागू असलेस) त्याची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

Ranwde 28/06/23

सचिव

देवस्थान व्यवस्थापन समिती

पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर

प्रत -

१) कार्यालयीन वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी
२) देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर मुख्य कार्यालय नोटीसबोर्डवर प्रसिध्दीसाठी
३) श्री करवीर निवासिनी मंदिर, कोल्हापूर नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी
४) स्थानिक मंदिराकडे नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी